निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार
०६ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३६७ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## शिष्यवृत्ती परीक्षेकरिता नोंदणी आणि आवेदनपत्र भरण्यासाठी ६ मार्चपर्यंत मुदतवाढ

**मुंबई**/ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.४ थी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.७ वी) २६ एप्रिल, २०२६ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आली आहे.

या परीक्षेकरिता शाळा नोंदणी व विद्यार्थी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता नियमित शुल्कासह ६ मार्च, २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ.नंदकुमार बेडसे यांनी कळविले आहे.

या परीक्षेकरिता शाळा नोंदणी व विद्यार्थी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता ३० डिसेंबर २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुदत देण्यात आलेली होती.

तथापि शाळा नोंदणी व विद्यार्थी आवेदनपत्र / शुल्क भरणा करण्याकरीता वाढीव मुदत मिळण्यासाठी परीक्षा परिषदेस अनेक शाळांकडून विनंती प्राप्त झाली आहे. या अनुषंगाने अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. विलंब शुल्कासह ८ मार्च आणि अतिविलंब शुल्कासह १० मार्च पर्यंत ही मुदत असेल.

सदर परीक्षेकरिता ज्या शाळांनी अद्याप ऑनलाईन आवेदनपत्र भरले नसतील त्यांनी दिलेल्या मुदतीत सदर प्रक्रिया पूर्ण करावी. १० मार्च २०२६ नंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नाहीत.

याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा परिषदेमार्फत करण्यात आले आहे.

# महिलांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ देण्याची गरज - मंत्री ड.आशिष शेलार

**मुंबई** / महिलांच्या कला, सृजनशीलता आणि कर्तृत्वाला योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक असून महिलांच्या प्रतिभेला सजगतेने ओळख देणे गरजेचे आहे, असे मत सांस्कृतिक कार्यमंत्री ड.आशिष शेलार यांनी व्यक्त केले.

मुंबईतील पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे आयोजित महिला कला महोत्सव २०२६ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य महिला आयोगच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, ज्येष्ठ गायिका पद्मश्री अश्विनी भिडे-देशपांडे, राजश्री कुलकर्णी, नृत्यांगना सोनिया परचुरे, पुढारी मल्टीमीडियाच्या संपादक मृणालिनी नानिवडेकर, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, विविध क्षेत्रातील कलाकार, साहित्यिक आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री ड.शेलार म्हणाले की, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे नूतनीकरण झाल्यानंतर अवघ्या एका वर्षात येथे सुमारे एक हजाराहून अधिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. हे प्रांगण कलाकारांसाठी कला आविष्काराचा महायज्ञ ठरले असून येथे प्रत्येकाला आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी मिळत आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर बोलताना मंत्री ड. शेलार यांनी सांगितले की, महिला दिन केवळ शुभेच्छांपुरता मर्यादित न राहता महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याचा आणि त्यांना प्रोत्साहन देण्याचा दिवस आहे. समाजाने आपल्या घरात, कुटुंबात आणि परिसरात महिलांची प्रतिभा आणि क्षमता ओळखून त्यांना पुढे येण्यासाठी संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

महिलांचे हक्क, समानता आणि सबलीकरण या आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२६ च्या संकल्पनेचा उल्लेख करताना मंत्री ड.शेलार म्हणाले की, महिलांच्या सक्षमीकरणासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे आवश्यक आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी जनजागृती उपक्रम महत्त्वाचे - नंदिनी आवडे



महिलांच्या तक्रारींची संख्या वाढत असताना त्यांच्या समस्यांवर केवळ कायदेशीर मार्ग पुरेसा नसून महिलांमध्ये आत्मविश्वास व सक्षमीकरणाची भावना निर्माण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे यांनी केले.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहकार्याने आयोजित कार्यक्रमांमधून महिलांच्या संघर्ष आणि प्रेरणादायी बाबी समाजासमोर मांडल्या जात असून या माध्यमातून महिलांमध्ये सजगता आणि आत्मविश्वास वाढेल, असा विश्वास आवडे यांनी व्यक्त केला.

पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात महिला कला महोत्सव २०२६ कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. ७ मार्च २०२६ पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवामध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले.

## शिवमंदिराशेजारी खड्डा खणला, लिंबू-नारळ अन् अघोरी पूजा; गुप्तधनासाठी मांत्रिकासह ७ जणांना रंगेहाथ पडकलं

### गुप्तधनाच्या लालसेनं शिवमंदिरात पूजा
### शिवमंदिराच्या शेजारी खोदले खड्डे
### मांत्रिकासह ७ जणांच्या टोळीला अटक




**नांदेड**/ जमिनीखाली दडलेले गुप्तधन मांत्रिक शोधून देतात ही अंधश्रद्धा अजूनही अनेकांच्या मनात कायम आहे. मी पायाळू असून गुप्तधन दिसत असल्याचा दावा करून भोंदू मांत्रिक अनेकांना गंडा घालतात. असाच काहीसा प्रकार नांदेड जिल्ह्यात समोर आलाय. नायगाव तालुक्यातील गडगा जवळ महादेवाचे पुरातन मंदिर आहे. या मंदिराच्या आवरात काहीजण गुप्तधनासाठी खड्डे खोदून अघोरी पूजा करत असल्याची माहिती नायगाव पोलिसांना मिळाली. पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकत मांत्रिक आणि त्याच्यासह सात साथीदाराना अटक केली. तेलंगनातील मांत्रिकाने नायगावमधील काही जणांना गुप्तधनाचे अमिष दाखवून या ठिकाणी आणले होते. पोलिसांना या ठिकानी फावडे, पूजेचे साहित्य मिळाले. या सात जणांवर पोलिसांनी जादूटोनाविरोधी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला. हा प्रकार म्हणजे निव्वळ अंधश्रद्धा!

कोणत्याही जमिनीखाली मंत्रतंत्राने धन प्रकटत नाही. हा प्रकार म्हणजे निव्वळ अंधश्रद्धा आहे. या अंधश्रद्धेतून नरबळी देण्याच्या घटनाही अनेकदा घडल्या आहेत. मांत्रीकांना जर गुप्तधन दिसले असले तर या मांत्रीकांना सोन्याच्या खाणीच्या ठिकाणी बोलावले नसते का अशी प्रतिक्रिया अनिसने दिली.

गुप्तधन शोधून देतो म्हणून भोंदू मांत्रिक अनेकांना आपल्या जाळ्यात अडकवतात. त्यातून लोकांची आर्थिक फसवणूक होते. याच भोंदूबाबा आणि अंधश्रद्धेला आळा बसावा यासाठी कायदा करण्यासाठी नरेंद्र दाभोळकर यांनी आयुष्य खर्ची घातले. त्यांच्या लढ्यामुळे जादूटोना विरोधी कायदा अस्तित्वात आला. पण तरीही ए आय क्रांतीच्या या युगातही अंधश्रद्धा कायम आहे. त्यामुळे याबाबत सरकारने नेहमी जनजागृती करणे गरजेचे आहे.

माणूस मंगळावर स्वारी करण्याचे मनसुबे आखत असताना अजूनही गुप्तधनाचे हंडे शोधणारे महाभाग समाजात आहेत. विज्ञानयुगातही अंधश्रद्धांवर बुवाबाजीवर विश्वास ठेऊन स्वतः चं आणि समाजाचं नुकसान करणा-यांवर कठोर कारवाईची मागणी होतेय

## विद्यार्थी हितासाठी प्राध्यापक भरती प्रक्रियेचे कालबद्ध नियोजन करा - मंत्री चंद्रकांत पाटील



**मुंबई**/ राज्यातील विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापक पदांच्या भरतीला शासनाने मान्यता दिली असून ही भरती प्रक्रिया कालबद्ध नियोजन करून पूर्ण करावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिले.

होमी भाभा राज्य विद्यापीठ येथे मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरू व प्र-कुलगुरूंची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एनईपी २०२०) अंमलबजावणीसंदर्भात आढावा बैठक झाली त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उपसचिव प्रताप लुबाळ, सहसचिव संतोष खोरगडे तसेच अकृषी विद्यापीठांचे सर्व कुलगुरू, प्र-कुलगुरू व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, राज्यातील विद्यापीठांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रमवारीत (रँकिंग) वाढविण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. विद्यापीठांनी कालबद्ध नियोजन करून शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनवृद्धी, अध्यापनातील नावीन्य आणि प्रशासकीय कार्यक्षमता यांना प्राधान्य द्यावे. गुणवत्ता वृद्धीसाठी ठोस कृती आराखडा तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

बैठकीत प्राध्यापक भरती प्रक्रियेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमधील रिक्त पदांची माहिती संकलित करून नियमानुसार भरती प्रक्रिया राबवावी, असे निर्देश देण्यात आले. सर्व संबंधित संस्थांनी प्राध्यापक भरती प्रक्रिया जून २०२६ पर्यंत पूर्ण करावी, असेही स्पष्ट करण्यात आले. निर्धारित मुदतीपर्यंत प्राध्यापक भरती प्रक्रिया पूर्ण न झाल्यास संबंधित विद्यापीठे व महाविद्यालयांतील पदसंख्या कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असा इशाराही मंत्री पाटील यांनी दिला.

## गंगापूर नगरपालिकेच्या कार्य प्रणालीवर प्रश्नचिन्ह कर वसूली करून आठचा उतारा देण्यास टाळाटाळ

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी / सुभान शहा** /गंगापूर नगरपालिकेच्या कार्य प्रणाली वर प्रश्नचिन्ह गंगापूर शहरातील समता नगर प्रभाग क्रमांक पाच येथील रहिवासी कचरू मोहन शेळके यांनी नगरपालिका कडे नमुना नंबर आठ उतारा मिळण्यासाठी रितसर अर्ज केला होता परंतु महिना उलटून गेला तरी देखील नमुना नंबर आठ उतारा देण्यात आला नाही व दिलेल्या अर्जाची रितसर पावती देण्यात आली नाही. यामुळे कचरू मोहन शेळके यांनी नगरपालिकेच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित केला आहे. की मागील एक महिन्यापासून मला सदर कर्मचारी विविध प्रकारची दिशाभूल करणारी माहिती देऊन टाळाटाळ करून मला जाणून बुजून त्रास देण्याचा काम करत आहे. मला सांगत आहे की तुमची नगरपालिकेला नोंद नाही माझी नगरपालिकेला नोंद नाही आहे तर माझ्याकडून कर वसूली कशा आधारे नगरपालिकेने केली आहे असा प्रश्न आता या ठिकाणी कचरू मोहन शेळके यांनी उपस्थित केला आहे. नगरपालिकेच्या कर्मचाऱ्याकडून बोलण्यात येत आहे की तुम्ही काहीतरी पुरावा आणून द्या त्याच्या आधारे आम्ही तुम्हाला नमुना नंबर आठ चा उतारा देऊ असे बोलून मला वेळ काढूपणा करत आहे. नगरपालिका प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. आता या ठिकाणी कचरू मोहन शेळके यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की माजी नगरपालिकेला नोंद नाही आहे अशी जर कर्मचाऱ्याकडून मला दिशाभूल करणारी सल्ला देण्यात येत असेल तर प्रश्न असा उपस्थित झाला आहे की माझ्याकडून कर कोणत्या आधारे यांनी वसूल केला याची चौकशी करून संबंधितावर कायदेशीर कारवाई करावी व मला आठचा उतारा तात्काळ देण्यात यावे अशी मागणी कचरू मोहन शेळके यांनी केली आहे.

## असैनिकांच्या मुलांच्या वसतीगृहासाठी कंत्राटी पद्धतीने चौकीदार भरती

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत असलेले सैनिकी मुलांचे वसतिगृह,छत्रपती संभाजीनगर येथे कंत्राटी पद्धतीने चौकीदार हे या पदाची भरती होणार आहे. त्यासाठी माजी सैनिकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

पदाचा तपशील याप्रमाणे- चौकीदार, सैनिकी मुलांचे वसतिगृह, छत्रपती संभाजीनगर, पदसंख्या एक, मासिक मानधन २१ हजार १५९ रुपये, किमान एक वर्षांचा अनुभव.

पात्रता- माजी सैनिक,शारिरीक दृष्ट्या सक्षम,कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. इच्छुक माजी सैनिकांनी सर्व कागद पत्रासह (वैयक्तिक अर्ज,आधार कार्ड,रहिवाशी दाखला,पी.पी.ओ. बँक पासबुक,डिस्चार्ज बुक इ.) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामध्ये मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. माजी सैनिकांमधून उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर नागरिक उमेदवाराकडून भरण्यात येतील.अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नंदनवर कॉलोनी, भावसिंगपुरा रोड,छत्रपती संभाजीनगर दूरध्वनी ०२४०-२३७०३१३ वर संपर्क करावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे.

# सुनेत्रा पवारांनाही अजित पवारांच्या घातपाताचा संशय? कुटुंबासह झच् मोदीची घेणार भेट, दिल्लीत वेगवान घडामोडी

**दिल्ली**/ अजित पवार यांचा विमान दुर्घटनेत मृत्यू झाल्यानंतर हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय रोहित पवार वारंवार व्यक्त करत आहेत. रोहित पवारांनी आतापर्यंत तीन मोठ्या पत्रकार परिषदा घेतल्या असून, आपल्या शंका उपस्थित करत अनेक गंभीर आरोप आणि दावे केले आहेत. त्यांनी याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार देण्याचाही प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला नाही. या सर्व घडामोडींवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार किंवा जय पवार यांनी काही भाष्य केलेलं नाही. मात्र आता त्यांच्या मनातही शंका उपस्थित होत असल्याचं दिसत आहे. यासंदर्भात ते पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेणार आहेत.

**अजित पवारांचं कुटुंबीय घेणार नरेंद्र मोदींची भेट**

रोहित पवार यांच्याप्रमाणे अजित पवारांच्या कुटुंबियांनाही अजित पवार यांचा अपघात हा घातपात असण्याची शक्यता वाटत आहे. त्यामुळे, अजित पवार अपघात प्रकरणात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि कुटुंबीय पंतप्रधान मोदींची भेट घेणार आहेत. विमान अपघात प्रकरणाबाबत सखोल चौकशी केली जावी आणि वीएसआरची सगळी विमानं जमिनीवर आणली जावी अशी कुटुंबीयांची इच्छा असल्याचं सूत्रांची माहिती आहे.

**राज ठाकरेंनी सुनेत्रा पवारांना केलं होतं आवाहन**

रोहित पवारांनी भेट घेतल्यानंतर राज ठाकरेंनी एफआयआर दाखल केला जात नसल्याचा मुद्दा उपस्थित सुनेत्रा पवारांनीही विचार करावा असं म्हटलं होतं. पुढे ते म्हणाले की, मरीन ड्राईव्ह पोलिस स्टेशनला अधिकारी एफआयआर टाइप करुन घेत होते.

तितक्यात डीसीपी आले आणि एफआयआर घेऊ नका सांगितलं. हे कशासाठी आहे? जर काही नसेल, घातपात नसेल, पण घरच्यांना काही शंका असेल आणि चौकशी नीट व्हावी असं वाटत असेल तर सरकारकडून अडथळे का आणले जातात? सुनेत्रा ताईंनीही याचा विचार करावा त्यांचेच ते पती होते. त्यांच्यात पतीच्या अपघाताबद्दलचा एफआयआर आहे आणि सरकारकडून घेऊ नका म्हणून दबाव येत आहे. मला काही राजकारण माहिती नाही, पण राज्यात कुणीही एफआयआर नोंदवू शकता असं सांगितलं जातंय तर संशय का निर्माण होतो, असं ते म्हणाले होते.

**जय पवारांनी शेअर केला होता विमानातील व्हिडीओ**

जय पवारांनी तडठ कंपनीचे मालक रोहित सिंह यांचा एक व्हिडिओ समोर आणला आहे. यात रोहित सिंह मुख्य पायलटच्या सिटवर झोपलेले दिसत आहेत. रोहित सिंह यांच्या निष्काळजीपणाचा व्हिडिओ समोर आल्यानंतर तडठ च्या कारभारावर बोट ठेवण्यात आलं. या प्रकरणात रोहित सिंह यांना अटक करण्याची मागणी जय पवार यांनी केली आहे.

जय पवारांनी शेअर केलेल्या व्हिडिओनंतर पुन्हा एकदा तडठ कंपनीचा निष्काळजीपणा समोर आला आहे, कारण याआधीही रोहित पवार यांनी त्यांच्या प्रेझेंटेशनमधून आणि उऋछ-नं देखील त्यांच्या अहवालातून तडठ कंपनीच्या अनागोंदी कारभारावर बोट ठेवलं होतं, आणि आता चक्क या कंपनीच्या मालकाच्या निष्काळजीपणाचा व्हिडिओच समोर आला आहे, दरम्यान यानंतर रोहित पवारांनीही कडक शब्दात इशारा दिला आहे.



**...त्यांना मी सोडणार नाही- रोहित पवार**

हाच तो तडठ कंपनीचा मालक रोहित सिंह. आज तो जणूकाय राज्यातील सगळ्याच मोठ्या नेत्यांपेक्षाही मोठा झाला आहे. याच्याच लग्नाला केंद्रातील मंत्री आणि राज्यातील सत्तेतील बडे नेते गेले होते. म्हणूनच त्याला वाचवण्याचा सगळीकडूनच प्रयत्न होताना दिसत आहे. विमान हवेत असताना स्वतः पायलट असूनही झोप काढतानाचा त्याचा माझे बंधू जय पवार यांनी शेअर केलेला हाच तो व्हिडिओ..! उऋछ-ची आजपर्यंतची संपूर्ण हालचाल बघता त्यांच्याकडून यावर कारवाई होईल की नाही. याबाबत आमच्या मनात शंका आहे. पण दादांच्या विमान अपघाताला जबाबदार असलेल्यांना आम्ही कदापि सोडणार नाही असं रोहित पवार म्हणाले आहेत.

# आखातातील युद्धाची जगाला झळ....

इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ला चढवून मध्यपूर्वेत युद्धाला तोंड फोडले. आपल्यावर हल्ला होईल याची कल्पना इराणला होतीच. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जूनमध्येच इराणला तशी धमकी दिली होती. तरीही इराणचे नेतृत्व याबाबतीत गाफील राहले. इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ला करण्याची फुलप्रुफ योजना बनवली होती. या योजनेची इराणच्या गुप्तचर यंत्रणेला कुठलीही माहिती मिळाली नाही. हे इराणच्या गुप्तचर यंत्रणेचे अपयशच म्हणावे लागेल. त्याची मोठी किंमत त्यांना मोजावी लागली. इराणचे सर्वोच्च नेते आयातूला खामेनी आणि त्यांचे अनेक विश्वासू लष्करी अधिकारी एकाच वेळी मारले गेले. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण आपल्याला सहज शरण येईल असे अमेरिकेला वाटले पण झाले उलटेच. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण पेटून उठला. अमेरिकेला शरण जाण्यापेक्षा त्यांनी स्वाभिमानाने त्यांच्याशी लढण्याचे ठरवले. इस्रायल आणि अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्याचे ठरवून त्यांनी इस्रायलच्या प्रमुख शहरांना लक्ष केले इतकेच नाही तर आखातात ज्या ज्या देशात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत तिथे हल्ले सुरू केले. त्यामुळे युद्धाची व्याप्ती वाढली. अमेरिका आणि इस्रायलनेही इराणच्या तेहरानसह प्रमुख शहरांना लक्ष करून क्षेपणास्त्रांचा मारा सुरू ठेवला तरीही इराणने माघार घेतली नाही. खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराण शरण येईल आणि आपला सहज विजय होईल अशा आविर्भावात असलेल्या इराण आणि इस्रायलला आठवडा होत आला तरी हे युद्ध थांबवता आले नाही उलट युद्धाची व्याप्ती वाढली. ती इतकी वाढली की खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांना हे युद्ध आणखी तीन ते चार आठवडे चालेल असे सांगावे लागेल. जर हे युद्ध आणखी तीन ते चार आठवडे चालले तर त्याची झळ केवळ या तीन देशांना किंवा आखातातील देशांनाच बसेल असे नाही तर संपूर्ण जगाला याची झळ बसेल . त्याची सुरुवातही झाली आहे. इराणने इंधन वाहू जहाजांसाठी हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. या सामुद्रधुनीतून फक्त चीनच्या जहाजांना जाण्यास परवानगी असल्याचे इराणने म्हटले आहे इतर देशांच्या जहाजांनी जर या सामुद्रधुनीत प्रवेश केला तर तर जहाजांवर हल्ला करेल अशी धमकी इराणने दिली आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी इंधन वाहतूक करणाऱ्या जहाजांसाठी खूप महत्वाची सामुद्रधुनी आहे. आखाती देशातून इतर देशांना होणारा तेलपुरवठा याच समुद्रधुनीतून होतो ते जर ही सामुद्रधुनी बंद झाली तर संपूर्ण जगात इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण होईल परिणामी संपूर्ण जगावर मोठे संकट कोसळेल. हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून दररोज दोन कोटी बॅरल इंधनाची वाहतूक केली जाते. तसेच कतार आणि यूएइ या अरब देशातून नैसर्गिक वायूची निर्यात देखील केली जाते. इराणच्या या कारवाईमुळे या सागरी क्षेत्रातून होणारी इंधनाची वाहतूक खंडित झाली असून जागतिक पुरवठा साखळी संकटात सापडली आहे. गेल्या आठवड्यात आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर ७२ डॉलर इतके होते आता ते ८१ डॉलर पर्यंत पोहचले सर जर हे युद्ध आणखी काही दिवस असेच सुरू राहिले तर आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर प्रति बॅरल २०० डॉलरवर पोहोचतील असे जाणकार सांगत आहेत. याचाच अर्थ हे युद्ध जरी आखातात सुरू असले तरी त्याची झळ संपूर्ण जगाला बसू शकते. तेलाचे दर वाढले की महागाई वाढते हे असे अर्थशास्त्र सांगते त्यामुळे भविष्यात महागाईचा आगडोंब उसळू शकतो याचा फटका सर्वसामान्य जनतेलाच बसणार आहे. त्यामुळे हे युद्ध लवकरात लवकर संपणे हेच जगाच्या हिताचे आहे. हे युद्ध लवकर संपावे यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने प्रयत्न करायला हवेत. युद्ध थांबवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने हस्तक्षेप करायला हवा. संयुक्त राष्ट्रसंघाने शांतीसेना पाठवून हे युद्ध रोखायला हवे. हे युद्ध जर वेळीच थांबले नाही तर कदाचित जग तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले जाईल आणि त्यात संपूर्ण जग होरपळून निघेल.

# अपघात समयी मदतीस धावून येणारे 'राह-वीर'




रस्ते अपघात ही एक मोठी समस्या आहे. रस्त्यावरील प्रवास हा सुरक्षित करण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना राबविल्या आहेत. नुकतेच सेव्ह लाईफ फाऊंडेशन या संस्थेने केलेल्या सर्व्हेक्षणात छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा सर्वाधिक अपघात होणाऱ्या जिल्ह्यांपैकी एक आहे. सन २०२३-२४ मधील अहवालानुसार जिल्ह्यात ५२७ अपघाती मृत्यू जिल्ह्यात झाले आहेत. जिल्ह्यातील ९ प्रमुख मार्ग व २०९ अपघातप्रवण क्षेत्र नोंदविण्यात आले आहेत. या सर्व अपघातप्रवण स्थळांवर जिल्ह्यात विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्यावरील आवश्यक स्थापत्य बदल करणे, जनजागृती, वाहन आरोग्य तपासणी, वाहनचालकांचे प्रबोधन इ. अपघात घडल्यानंतर जखमींना रुग्णालयात नेणे व प्रत्यक्ष उपचार सुविधा उपलब्ध होणे यातील कालावधी कमित कमी करणे.

या सर्व प्रक्रियेत येणारे जाणारे सहप्रवासी, शेतकरी, ग्रामस्थ, रस्त्या लगत व्यवसाय करणारे लोक इ. यांची भुमिका मोठी मोलाची आहे. सामान्यपणे अपघातग्रस्तांना मदत केली तर उगाचच पोलिसांच्या चौकशीचा ससेमिरा मागे लागेल म्हणून अनेक लोक हे मदत कार्य ही टाळत असतात.

मात्र यामुळे कुणाच्या तरी प्राणावर बेतते हे मात्र महत्त्वाचे. कुणाचाही असो जीव लाख मोलाचा असतो. एका व्यक्तीमागे एक कुटूंब उध्वस्त होत असतं. अशावेळी चौकशीचा ससेमिरा मागे लागेल म्हणून ही मदत न करण्याची प्रवृत्ती किंवा भावनेपासून लोकांना परावृत्त करण्यासाठी ही राह वीर योजना जाहीर केली आहे.

रस्ते अपघातातील जखमींना 'गोल्डन अवर' (त्रेश्चवशप र्कीी) मध्ये तातडीने मदत करून त्यांचे प्राण वाचवणाऱ्या नागरिकांना (त्रेब्व डारीळींरपी/ ठरहींशशी) प्रोत्साहित करण्यासाठी केंद्र सरकारने 'राह-वीर ही नवीन योजना जाहीर केली आहे. या योजनेत या राह वीरांना २५ हजार रुपयांचे पारितोषिकही दिले जाते.

जिल्हास्तरावर या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी

प्रत्येक जिल्ह्यात एक समिती असेल ज्याचे अध्यक्ष जिल्हाधिकारी (ऊच्) असतील. इतर सदस्यांमध्ये

खालील व्यक्तींचा समावेश असतो- * पोलीस अधीक्षक (SSP)

*मुख्य वैद्यकीय अधिकारी (CMOH)

* उप / प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO)

जेव्हा एखादा ' राह-वीर' अपघाताची माहिती देईल, तेव्हा पोलिसांनी डॉक्टरांकडून खातरजमा करून त्याला अधिकृत पत्रावर 'पोचपावती' (-लङ्गपुेश्रशवसाशपीं) देतील व ते त्यांना अनिवार्य असेल.

जर नागरिक जखमीला थेट रुग्णालयात घेऊन आला, तर रुग्णालयाने ही माहिती तात्काळ पोलिसांना कळवावी त्याद्वारे पोलिसांना पोचपावती देणे शक्य होते. पोलीस ठाण्याकडून आलेल्या पोचपावतीची प्रत जिल्हा मूल्यमापन समितीकडे पाठवली जाईल. ही समिती दरमहा आलेल्या प्रस्तावांचे पुनरावलोकन करेल आणि पात्र नावांची यादी EADAR पोर्टलच्या माध्यमातून राज्याच्या परिवहन आयुक्तांकडे (ढीरपीेींउाळीीळेपशी) पाठवेल.

प्रत्येक जिल्ह्याने दरवर्षी ३० सप्टेंबरपर्यंत त्यांच्या जिल्ह्यातील ३ सर्वोत्तम 'राह-वीरांची पाठवलेली नावे राज्यस्तरीय समितीकडे राष्ट्रीय पुरस्कारासाठी शिफारस म्हणून पाठविली जातात. थोडक्यात कुणाचे तरी प्राण वाचवण्याचे कार्य अजोड आहे. त्यास चालना देऊन सामाजिक जबाबदारीचे भान वाढविण्याचे व पर्यायाने रस्ते अपघातातील जिवीत हानी कमी करण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत, हे महत्त्वाचे.

- **संकलनः जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.**

# हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक: कनकोरीची मानाची काठी मढीकडे रवाना; भक्तांचा उत्साह शिगेला

**आत्ताच एक्सप्रेस**
**शिल्लेगाव/गंगापूर (प्रतिनिधी/ फिरोज मन्सुरी)**/ गंगापूर तालुक्यातील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे अढळ स्थान असलेल्या कनकोरीची मानाची काठी बुधवारी (४ मार्च) श्रीक्षेत्र मढीकडे मोठ्या उत्साहात रवाना झाली. 'अलख निरंजन'च्या जयघोषात आणि वाजत-गाजत निघालेल्या या पायी दिंडी सोहळ्याने संपूर्ण परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

**हनुमान दर्शनाने प्रस्थान**

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र मढी येथे रंगपंचमी निमित्त चैतन्य कानिफनाथ महाराज यांची मोठी यात्रा भरते. या यात्रेसाठी गंगापूर तालुक्यातील एकमेव असणाऱ्या कनकोरीच्या मानाच्या काठीचे प्रस्थान शिल्लेगाव येथील नवसाला पावणाऱ्या हनुमान भगवंताचे दर्शन घेऊन करण्यात आले.

**मानकरी व भाविकांचा सत्कार**

दिंडी रवाना होण्यापूर्वी 'धर्मवीर अध्यात्मिक सेने'चे जिल्हाप्रमुख कडूबाळ महाराज गव्हांदे यांच्या हस्ते काठीचे मानकरी व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये:

फिरोज मन्सुरी (पत्रकार, लासूर स्टेशन - काठीचे मानकरी)

**बाळासाहेब कुकलारे (शिल्लेगाव)**

यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी परिसरातील नाथभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**काठीची वैशिष्ट्ये आणि आख्यायिका**

कनकोरीची ही काठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दुसरी मानाची काठी म्हणून ओळखली जाते. या काठीबद्दल एक विशेष आख्यायिका सांगितली जाते:

जेव्हा कनकोरीची ही मानाची काठी चैतन्य कानिफनाथ महाराजांच्या मंदिराच्या कळसाला भेट देते (स्पर्श करते), तेव्हा मंदिराचा कळस हलतो. या विलक्षण घटनेनंतरच यात्रेचा अधिकृत समारोप होतो.

**प्रवासाचा मार्ग**

ही पायी दिंडी शनिवारी चार मुक्काम पूर्ण करून मढी येथे पोहोचणार आहे. रंगपंचमीच्या दिवशी, ज्या दिवशी कानिफनाथ महाराजांनी संजीवन समाधी घेतली होती, त्या मुहूर्तावर ही काठी मढीमध्ये दाखल होईल.

**मढी यात्रेचे महत्त्व**



नवनाथांपैकी एक असलेल्या चैतन्य कानिफनाथ महाराजांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील मढी येथे रंगपंचमीला समाधी घेतली होती. त्यामुळे दरवर्षी या ठिकाणी राज्यभरातूनच नव्हे, तर देशभरातून लाखो भाविक दर्शनासाठी येतात. कनकोरीच्या काठीचे या यात्रेत विशेष स्थान असून, ही काठी हिंदू-मुस्लिम संस्कृतीच्या समन्वयाचे जिवंत उदाहरण मानली जाते.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१
## सरपंचांचा सक्रीय सहभाग आवश्यक- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा -१ अंतर्गत जिल्ह्यात राबविण्यास येत्या ७ तारखेपासून सुरुवात होत आहे. शिबीराचा अंतिम उद्देश हा ग्रामस्थांना सेवा देणे हा असून त्यासाठी सरपंचांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्ह्यातील सरपंचांना केले. यावेळी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनीही सरपंचांशी दुरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधला.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा -१ जिल्ह्यात ८४ मंडळस्तरावर दि.७ ते १४ मार्च व एप्रिल महिन्यात १० ते १७ एप्रिल या कालावधीत तर नगरपालिकास्तरावर ८ ते १५ मे दरम्यान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने आज जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींच्या सरपंचांशी व ग्रामस्तरीय अधिकाऱ्यांशी दुरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यावेळी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त पापळकर यांनी सरपंचांना या शिबिरांमध्ये सक्रीय सहभाग देण्याचे आवाहन केले. गावातील एकल महिला वा तत्सम गरजू निराधार व्यक्तिंना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, गावातील पाणंद रस्ते, प्रलंबित फेरफार, अभिलेख दुरुस्ती, ७/१२ नोंदी दुरुस्ती, महसूली कायद्यांची जनजागृत व अंमलबजावणी, दाखले वाटप, तुकडे बंदी, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूरी अशा विविध सेवांचे लाभ गोरगरिबांना देण्यात यावे,असेही आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, या शिबिरात आरोग्य तपासणी, योजनांची जनजागृती अशा बाबींचाही समावेश करावा. अधिकाधिक गरजूंनालाभ मिळावा यासाठी सरपंचांनी आपले सक्रीय योगदान द्यावे,असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यातील ९ तालुके, ८४ मंडळ, ५०० सजा व १३६९ गावांमध्ये हे अभियान राबविण्यात येणार असून सर्व मिळून ८४ शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

शिबिरांचे वेळापत्रक या प्रमाणे-

दि.७ मार्च रोजी- भावसिंगपूरा अपर तहसिल, शेकटा ता. छत्रपती संभाजीनगर, निजलगाव ता. पैठण, वडोदबाजार ता. फुलंब्री, वेरुळ ता. खुलताबाद, चिंचोली ता. कन्नड, शिवना ता. सिल्लोड, जरंडी ता. सोयगाव, तुर्काबाद ता. गंगापूर, खंडाळा ता. वैजापूर.

दि.१० मार्च रोजी- आपेगाव ता. पैठण, नाचनवेल ता. कन्नड, गोळेगाव बु. त. सिल्लोड, शेंदूरवादा ता. गंगापूर, शिऊर ता. वैजापूर.

दि.१४ मार्च रोजी

चौका ता. छत्रपती संभाजीनगर, ढोरकीन ता. पैठण, पिरबावडा ता. फुलंब्री, चापानेर ता. कन्नड, अजिंठा ता. सिल्लोड, बनोटी ता.सोयगाव, वाळूज ता. गंगापूर, गारज ता. वैजापूर.

दि.२४ मार्च रोजी- करमाड ता. छत्रपती संभाजीनगर, पिंपळवाडी ता. पैठण, चिकलठाण ता. कन्नड, पालोद ता. सिल्लोड, आसेगाव ता. गंगापूर, लासूरगाव ता. वैजापूर.

दि.३० मार्च रोजी - कचनेर ता. छत्रपती संभाजीनगर, नादर ता. पैठण, उंडणगाव ता. सिल्लोड, डोणगाव ता. गंगापूर, लोणी खु. वैजापूर.

दि.१० एप्रिल रोजी

कांचनवाडी, अपर तहसिल, वरुड काजी ता. छत्रपती संभाजीनगर, बिडकीन ता. पैठण, आळंद ता. फुलंब्री, बाजारसावंगी ता. खुलताबाद, पिशोर ता. कन्नड, निल्लोड ता. सिल्लोड, सावळदबारा ता. सोयगाव, हर्सूल ता. गंगापूर, जानेफळ ता. वैजापूर.

दि.१७ एप्रिल रोजी

पंढरपूर अपर तहसिल, चित्ते पिंपळगाव ता. छत्रपती संभाजीनगर, बालानगर ता. पैठण, बाबरा ता. फुलंब्री, सुलतानपूर ता.खुलताबाद, करंजखेडा ता. कन्नड, भराडी ता.सिल्लोड, सिद्धनाथ वडगाव ता. गंगापूर, महालगाव ता. वैजापूर.

दि.२३ एप्रिल रोजी

लोहगाव ता. पैठण, देवगाव रंगारी ता. कन्नड, आमठाणा ता.सिल्लोड, गाजगाव ता.गंगापूर, बोरसर ता. वैजपुर.

दि.३० एप्रिल रोजी

लाडसावंगी ता. छत्रपती संभाजीनगर, आडूळ ता. पैठण, हतनूर ता. कन्नड, अंभई ता. सिल्लोड, भेंडाळा ता. गंगापूर, नागमठाण ता.वैजापूर.

दि.५ मे रोजी

पिसादेवी ता. छत्रपती संभाजीनगर, पाचोड ता. पैठण, नागद ता. कन्नड, बोरगाव बाजार ता. सिल्लोड, जामगाव ता. गंगापूर, बाबतारा ता. वैजापूर.

दि.८ मे रोजी

छत्रपती संभाजीनगर, पैठण, फुलंब्री, खुलताबाद, कन्नड, सिल्लोड, सोयगाव, गंगापूर, वैजापूर.

दि.१५ मे रोजी उस्मानपुरा अपर तहसिल, चिकलठाणा ता. छत्रपती संभाजीनगर, विहामांडवा ता. पैठण, मांजरी ता. गंगापूर, घायगाव ता. वैजापूर.

# नाथा घरी श्रीहरी कावडीने पाणी भरी; रांजण पुजनेने नाथषष्ठी सोहळ्यास प्रारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी/ बबन उदावंत** / दक्षिण काशीतील पैठण क्षेत्री श्री संत एकनाथ महाराज यांचा ४२७ वा जलसमाधी उत्सव आज दि.५ मार्च तुकाराम बीजेच्या शुभ पर्वावर गावातील नाथ मंदिरातील श्रीखंड्या रांजन पुजनाने झाली. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी रघुनाथ बुवा गोसावी, ज्ञानेश बुवा गोसावी, योगेश बुवा गोसावी, पुष्कर गोसावी, रावसाहेब बुवा गोसावी,उल्का गोसावी, अपूर्वा गोसावी, श्रीनिधी गोसावी, माधुरी पांडव,रवींद्र पांडव,रेखा कुळकर्णी, श्रीकृष्ण कुळकर्णी, माधव भाले,घनश्याम नाईक,प्रकाश नाईक, हरिभाऊ जोशी, प्रमोद कोळेश्वर,सुरेश जोशी, सुवर्णा उपाध्याय, मंगल नाईक अदि भाविक उपस्थित होते.

भगवान श्रीकृष्णाने श्रीखंड्या हे नाव धारण करून नाथांच्या वाड्यावर सेवेचे काम १२ वर्षे बजावले.नाथांच्या घरी दररोज अन्नदानाच्या पंगती उठत त्यासाठी पाणी कमी पडू नये म्हणून गोदावरीवरुन पाणी आणुन नाथ वाड्यातील रांजण भरण्यासाठी श्रीखंड्या सदैव तत्पर राही.भगवान श्रीकृष्णाने श्रीखंड्या नाव धारण करून नाथ वाड्यावर सेवा बजावल्याची अनुभूती नाथांना आल्यावर त्यांना सुखद आनंदाचा धक्का बसला पण आपल्या वाड्यावर देवाने वाटेल ते काम करण्याची सेवा बजावल्यानंतर नाथ अस्वस्थ झाले. पुरोहित चंद्रशेखर उपाध्ये,रवींद्र साळजोशी यांच्यासह ११ पुरोहितांच्या मंत्रघोषात दुपारच्या सत्रात रांजण पुजा संपन्न झाली. त्यानंतर रांजणात पाणी टाकण्यास सुरुवात करून नाथषष्ठी उत्सवाला सुरुवात झाली. हा रांजण भरण्यास दोन ते तीन दिवस लागतात. बहुधा हा रांजण चतुर्थदशीला भरतो.ज्या भक्ताच्या हस्ते रांजण भरतो

त्या भक्ताचा सत्कार केला जातो. गावातील नाथ मंदिरातील हा रांजण दगडी असुन तो २१ फुट खोल असून उत्तर दक्षिण ६ फुट तर पूर्व पश्चिम ८ फुट असा आहे. जवळपास २० हजार लिटर पाणी यात मावते.रांजणाच्या तळाशी दगडी विठ्ठल मूर्ती नाथांनी स्थापन केलेली आहे.



# नागद काँग्रेसच्या तिकिटावरून निवडून आलेल्या जि. प. सदस्य तृप्ती राजपूत भाजपमध्ये प्रवेश... कन्नडमध्ये खळबळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम** / कन्नड तालुक्यातील नागत सर्कलच्या काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्या तृप्ती दिलीपसिंह राजपूत यांनी बुधवारी (४ फेब्रुवारी) भाजपमध्ये प्रवेश केल्याने कन्नड तालुक्यात खळबळ उडाली आहे. त्यांनी कमळ हाती घेतले. निकालानंतर अवघ्या २३ दिवसांतच तृप्ती राजपूत यांनी पक्ष बदलल्याने जिल्हा परिषदेच्या सभागृहात काँग्रेसची पाटी मात्र कोरी झाली आहे. तृप्ती राजपूत यांनी शिंदे गटाच्या उमेदवार चंद्रकलाबाई राठोड यांचा १ हजार १४८ मतांनी पराभव केला होता. विजयानंतर महिना पूर्ण होण्यापूर्वीच त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली. त्यांच्यासोबतच डॉ. दिलीपसिंह राजपूत आणि काँग्रेसच्या पंचायत समिती सदस्य कविता संतोष राठोड यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी मंत्री अतुल सावे, भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, आमदार प्रशांत बंब आणि डॉ. दिनेश परदेशी उपस्थित होते.







# खुलताबादमध्ये उपोषणाचे नाट्य; भडजी येथील गायरान जमिनीवरून सरपंच आणि सदस्यात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद प्रतिनिधी**/ खुलताबाद तालुक्यातील भडजी येथील गायरान गट क्रमांक १७५ मधील अवैध गौण खनिज उत्खनन, वृक्षतोड आणि कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून खुलताबाद तहसील कार्यालयासमोर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर गवळी यांनी बुधवारपासून प्रशासनाविरोधात बेमुदत उपोषण सुरू केले असून, दुसरीकडे सरपंच बाबासाहेब वाकळे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावत उपोषणकर्त्यांवरच गंभीर पलटवार केला आहे.

**नेमके प्रकरण काय? (ज्ञानेश्वर गवळी यांचे आरोप)**

ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर गवळी यांच्या दाव्यानुसार, भडजी येथील गायरान जमिनीवर मागील काही वर्षांपासून १०० कोटी रुपयांहून अधिक मूल्याचे अवैध उत्खनन झाले आहे. त्यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:

अवैध उत्खनन व वृक्षतोड: रात्रीच्या वेळी उत्खनन आणि सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जात असून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.

सरकारी कामात अडथळा: भूमी अभिलेख विभागाच्या मोजणी दरम्यान अधिकाऱ्यांवर दगडफेक करण्यात आली. याप्रकरणी सरपंच बाबासाहेब वाकळे यांच्यावर कलम ३५३ अन्वये गुन्हा दाखल करावा.

दोषींवर कारवाई: महसूल विभागाचे संबंधित अधिकारी, तलाठी आणि ग्रामसेवक यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी.

**आमदार प्रशांत बंब यांची एन्ट्री**

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आमदार प्रशांत बंब यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवले आहे. त्यांनी केवळ उत्खननाचीच नव्हे, तर भडजी ग्रामपंचायतीमधील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीत झालेल्या कथित भ्रष्टाचाराचीही स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. महसूल बुडवणाऱ्या आणि वृक्षतोड करणाऱ्या दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

सरपंच बाबासाहेब वाकळे यांचे प्रत्युत्तर

या उपोषणासंदर्भात जेव्हा सरपंच बाबासाहेब वाकळे यांची बाजू जाणून घेण्यात आली, तेव्हा त्यांनी हे उपोषण राजकीय सूडबुद्धीने प्रेरित असल्याचे म्हटले आहे. त्यांनी उपोषणकर्त्यांवरच गंभीर आरोप करत खालील मुद्द्यांवर आपली प्रतिक्रिया दिली:

माझ्यावर करण्यात आलेले सर्व आरोप बिनबुडाचे आहेत. मोजणी दरम्यान दगडफेक किंवा सरकारी कामात अडथळा आणण्याचा कोणताही प्रकार माझ्याकडून झालेला नाही. राजकीय द्वेषापोटी माझी प्रतिमा मलीन करण्यासाठी हे आंदोलन केले जात आहे.

**- बाबासाहेब वाकळे (सरपंच, भडजी)**

**प्रशासनासमोर मोठे आव्हान**

दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या उपोषणामुळे तहसील प्रशासनावर दबाव वाढला आहे.

एकीकडे १०० कोटींच्या अवैध उत्खननाचा दावा आणि दुसरीकडे स्थानिक राजकारणातील संघर्ष, यामुळे तहसीलदार यावर काय मार्ग काढतात याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. आंदोलकांनी इशारा दिला आहे की, जर तात्काळ स्थळ पाहणी करून दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.



# छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियान टप्पा क्र. १ प्रभावी राबविण्यासाठी विभागीय आयुक्तांचा सरपंचांशी संवाद




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियान टप्पा क्र. १ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दि. ४ मार्च रोजी विभागातील पाच जिल्हे तसेच दि. ५ मार्च रोजी विभागातील उर्वरित तीन जिल्ह्यांतील सरपंचांशी ऑनलाईन माध्यमातून ग्रामसंवाद साधला. या संवादामध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला.

गावपातळीवरील नागरिकांना भेडसावणाऱ्या महसूल विषयक अडचणी जसे की वारस नोंद, नाव दुरुस्ती, जमीन अभिलेखाशी संबंधित बाबी, ७/१२ उतारा दुरुस्ती, नकाशे तसेच इतर महसूल विषयक प्रकरणे अभियानाच्या माध्यमातून जलदगतीने निकाली काढण्यावर भर देण्यात येणार असल्याचे यावेळी आयुक्त पापळकर म्हणाले.

विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून शिबिर नियोजनाबाबत आढावा घेतला.

या संवादामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील सरपंचांना बोलण्याची संधी देण्यात आली. काही सरपंचांनी गावपातळीवरील अडचणी मांडल्या, तर काहींनी अभियानाच्या नियोजनाबाबत माहिती दिली. तसेच हे अभियान उपयुक्त असून याचा फायदा गावातील सर्व नागरिकांना होईल, असे मतही अनेक सरपंचांनी व्यक्त केले.

गावपातळीवरील सर्व यंत्रणांनी आपापसातील भेदभाव व मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करावे, असे आवाहनही विभागीय आयुक्त पापळकर यांनी केले.

सरपंचांनी आपल्या गावातील सार्वजनिक तसेच वैयक्तिक प्रलंबित कामांची यादी तयार करून शिबिराच्या दिवशी प्रशासनाकडे सादर करावी, असेही त्यांनी सांगितले. शिबिरात प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर कायदेशीर बाबी तपासून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असेही विभागीय आयुक्त पापळकर यांनी स्पष्ट केले.

अभियान नागरिकाभिमुख असून महसूल प्रशासन गावपातळीवर नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यामुळे सरपंचांनी गावातील महसूल विषयक प्रलंबित प्रकरणांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवून नागरिकांना या अभियानाचा लाभ मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त पापळकर यांनी केले.

शिबिरात प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जास पोहोचपावती देण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांना दिले आहेत. या शिबिरामध्ये इतर विभागांचाही समावेश असल्याने संबंधित विभागांशी निगडीत प्रलंबित कामांबाबतचे अर्जही नागरिकांनी सादर करावेत, असेही यावेळी सरपंचांना सांगण्यात आले.

संवादादरम्यान लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने अभियानांतर्गत अर्ज सादर करण्यासाठी टठ कोड तयार केल्याची माहिती दिली. या कोडच्या माध्यमातून अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. तसेच नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्व सरपंचांसाठी एक व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक उपलब्ध करून दिला असून त्यावर गावातील प्रलंबित कामांची यादी पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विविध दाखले व प्रमाणपत्रे शाळांमध्येच उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देशही विभागीय आयुक्तांनी दिले.

या शिबिरामध्ये एकल महिला पुनर्वसन व विकास कार्यक्रम हा नाविन्यपूर्ण उपक्रमही राबविण्यात येणार आहे. सरपंचांनी गावातील एकल महिलांच्या प्रलंबित कामांचा आढावा घेऊन त्यामध्ये सातबारा संबंधित बाबी, रेशनकार्ड, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी योजना तसेच इतर योजनांशी संबंधित कामे शिबिरांतर्गत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्त पापळकर यांनी दिले.

प्रत्येक गावात शिबिर होणाऱ्या तारखेबाबत भिंतींवर माहिती रंगवून प्रसिद्धी करावी, जेणेकरून सर्व नागरिकांना शिबिराची माहिती मिळेल आणि अधिकाधिक नागरिकांना या सेवांचा लाभ घेता येईल, असेही विभागीय आयुक्त म्हणाले.

मतदानाच्या प्रचाराप्रमाणेच सरपंचांनी गावातील प्रत्येक घरी भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्याबाबत अर्ज सादर करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असेही ते म्हणाले.

ग्रामपंचायत स्तरावर या अभियानाची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी सरपंच व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही विभागीय आयुक्तांनी केले.

या ग्रामसंवादात विभागातील सर्व जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच विभागातील सरपंच मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पैठण कडे जाणाऱ्या जड वाहतुक मार्गात दि.९ ते ११ दरम्यान बदल

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ पैठण येथे दि.९ ते ११ या कालावधीत संत एकनाथ महाराज नाथषष्ठी यात्रोत्सव आहे. राज्यभरातून अंदाजे १२ ते १५ लाख भाविक विविध वाहनाने वा पायी यात्रा उत्सवाकरीता येत असतात. या कालावधीत वाहतुकीची कोंडी निर्माण होऊ नये यासाठी पैठणकडे जाणाऱ्या व पैठण कडून येणाऱ्या जड वाहतूक मार्गात बदल करण्यात येत असल्याचे आदेश पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड यांनी निर्गमित केले आहेत.

वाहतुक मार्गातील बदल याप्रमाणे-

१. शहागड-आपेगाव- पैठणकडून -छत्रपती संभाजीनगरमार्गे जाणारी वाहने शहागड -पाचोड -मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे येतील.

२. सोलापूर धुळे एनएच - ५२ महामार्ग कचनेर फाटा, पोरगाव चौफुली, बिडकीन -शेकटा -इसारवाडी फाटा- छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर हायवे मार्गे अहिल्यानगर कडे जाणारी वाहने सोलापूर धुळे एनएच -५२ महामार्ग बीड मार्गे येणारी जड वाहतूक ही एनएच -५२ महामार्ग ते सरळ पुढे ए-एस क्लब मार्गे छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर हायवेने अहिल्यानगरकडे जातील. याचप्रमाणे उलट दिशेने वाहने ये-जा करतील.

३. जालना कडून करमाड -कचनेर फाटा-पोरगाव - बिडकीनचे- शेकटा इसारवाडी फाटा -छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर हायवे मार्गे अहिल्यानगर कडे जाणारी वाहने ही करमाड -कचनेर फाटा -सोलापूर धुळे एनएच-५२ महामार्ग ते सरळ पुढे ए-एस क्लब मार्गे छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर हायवे ने अहिल्यानगरकडे जाईल.या प्रमाणेच उलट दिशेने वाहने ये-जा करतील.

४. छत्रपती संभाजीनगर- बिडकीन -पैठण मार्गे शेवगांव कडे जाणारी वाहने छत्रपती संभाजीनगर -वाळूज-गंगापुर-वाळुज मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे जातील.

५. शेवगाव-पैठण-बिडकिन मार्गे छ.संभाजीनगराकडे येणारी वाहने शेवगाव -नेवासा-गंगापुर-वाळुज मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे जातील.

६.इसारवाडी फाटा -शेकटा-बिडकिन-पैठण कडे येणारी जड वाहने इसारवाडी फाटा ए.एस.क्लब छत्रपती संभाजीनगर बीड बायपास मार्गे पाचोड कडे जातील.

# 'राह-वीर' रस्ते अपघातप्रसंगी मदत करणाऱ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजनेची माहिती लोकांपर्यंत पोहोचवा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ रस्ते अपघात प्रसंगी जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करुन सेवाभावी कार्य करणाऱ्या मृत्यूंजय दुतांना प्रोत्साहन दिले पाहिजे. जिल्ह्यातील रस्ते अपघातातील मृत्यू रोखण्यासाठी लोकांपर्यंत 'राह-वीर' योजनेची माहिती पोहोचवा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, कार्यकारी अभियंता श्रीमती प्रिया पुजारी, सहा. अधीक्षक अभियंता पूजा रावळे, उपविभागीय अभियंता श्रीराम ढाकणे, डी.एम. कोलते, मनपा कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. सारिका लांडगे, डॉ. महेश लड्डा, , सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी संदीप शेलर, पोलीस निरीक्षक महामार्ग विभाग किशोर चौधरी, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अनिकेत कुलकर्णी, उपआयुक्त वाहतुक सुभाष भुजंग, पोलीस निरीक्षक वाहतुक आनंद झोटे आदी मुख्यालयातून तर सेव्ह लाईफ फाऊंडेशन चे निलेश साळूंखे, गौतम सिंग, वैष्णवी कारेकर आदी दुरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

**संयुक्त उपाययोजनांवर भर**

सेव्ह लाईफ फाऊंडेशन या संस्थेने सन २०२३-२४ मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणाच्या अहवालानुसार, जिल्ह्यात २०९ अपघातप्रवण स्थळे आहेत. जिल्ह्यात शून्य अपघात अभियान राबविण्याच्या दृष्टिने उपाययोजना राबविणे अपेक्षित असून त्यासाठी अपघातप्रवण स्थळांवरील अपघात प्रवणता निर्मूलन करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,महानगरपालिका, आरोग्य विभाग, परिवहन विभाग, गृह विभाग, शिक्षण विभाग अशा सर्व विभागांनी संयुक्तपणे उपाययोजना राबवावयाच्या आहेत.

**भौगोलिक स्थान माहिती सेवा देणार**

जिल्ह्यात नक्की करण्यात आलेल्या अपघातप्रवण स्थळांचे भौगोलिक अंकन करण्यात आले आहे. त्या अंकनाची माहिती भौगोलिक स्थान माहिती सेवा पुरविणाऱ्या संस्थांना द्यावी. त्यानुसार वाहन चालक वाहन चालवितांना या सेवांचा वापर करेल व रस्त्यात पुढे येणाऱ्या अपघातप्रवण स्थळाबाबत त्यास आगाऊ सुचना मोबाईलद्वारे दिली जाईल.तसेच रस्ते अपघातात जखमी झालेल्या व्यक्तिंना अपघात झाल्यापासून ते प्रत्यक्ष उपचार मिळण्याचा कालावधी हा कमीत कमी करण्याबाबतही उपाययोजना कराव्या. त्यासाठी १०८ क्रमांक रुग्णवाहिकांची व्यवस्था सुसज्ज असावी.

**मृत्युंजय दुतांना २५ हजार रुपयांचे बक्षीस**

अपघात प्रसंगी मदत करण्यासाठी अनेक लोक उगाच चौकशीचा ससेमिरा मागे लागेल म्हणून मदत करण्याचे टाळतात. मात्र अशा मदत करणाऱ्या मृत्युंजय दुतांना 'राह-वीर' या योजनेत २५ हजार रुपये इतके बक्षीस देऊन सन्मानित करण्यात येते,अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

या योजनेची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावी, जेणेकरुन रस्ते अपघातप्रसंगी मदत करण्यासाठी लोक पुढे येतील,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

तसेच त्यासाठीची जिल्हास्तरीय समितीही गठीत करावी,असे निर्देशही त्यांनी दिले.

# नादरपुर येथील विठ्ठल रुक्मिणी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता





**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम** / कन्नड तालुक्यातील नादरपुर विठ्ठल रुक्मिणी अखंड हरीनाम सप्ताह निमित्ताने सकाळी गावात दिंडी काढून मिरवणूक करण्यात आली व नंतर दुपारी काल्याच्या किर्तनातून प्रसंगी काळ सोडून भक्ती करा. जो संशयाने घेरला.त्याच्या नाशाला काळजीने उडी घातलीच समजा. यासाठी निःसंशय वृत्ती मिळवा. आपल्या बोलण्यातून कोणी दुखावल्या जाणार नाही याची काळजी घ्या. एक वेळ हाताने पेटवलेले विझविता येईल पण मुखातून गेलेले शब्द विझविता येत नाही कोणतीही गोष्ट करताना डोक्यात नाही तर मनात धरा.. मनाशी मैत्री करा. मनाचा एक गुण खूप चांगला आहे. त्याला ज्या विषयाची गोडी एकदा लागली तो विषय मग ते काही झाले तरी सोडीत नाही म्हणून त्याला भक्तिमार्गाची आवड लावा. देव प्रेमाचा भुकेला आहे हो तुम्ही मनापासून प्रेम द्या तुमच्या हाकेला ओ देण्यास ईश्वर तत्पर असतो, असे ह.भ.प मुरारी महाराज आनंदे यांनी सांगितले. नादरपूर येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.नादरपुर येथे तुकाराम बीज निमित्ताने विठ्ठल रुक्मिणी अखंड हरीनाम सप्ताह सुरू असून, सात दिवस चालणाऱ्या सप्ताहात विविध महाराजांचे कीर्तन संपन्न झाले धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, विविध कीर्तनकारांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. ह भ प मुरारी महाराज आनंदे म्हणाले की अभिमानी माणूस जीवनात कधीच सुखी रहात नाही, अभिमान बाळगू नका अभिमान हा सर्व दुःखाचे चिंतेचे व्यापाचे व संतापाचे मूळ आहे यासाठी प्रथम त्याचा त्याग करा आपल्या जीवनात अनुभवास येणारे सुखदुःख हे प्रारब्धाधीन आहे, हे लक्षात ठेवून नेहमी आनंदी रहा विकासाकडे वाटचाल करणाऱ्या नादरपुर गावाने आपल्या गावाचा आदर्शपणा कायम जोपासत आहेत त्याबद्दल ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सर्व सदस्य गावकरी सर्वांचे आभार व गायनाचार्य ह भ प कैलास महाराज गोरे ह भ प संदीप महाराज काचोळे ह भ प एकनाथ महाराज शेलार ह भ प गणेश महाराज ह भ प सोपान महाराज निकम ह भ प सुभाष महाराज निकम मृदंगाचार्य ह भ प कृष्णा महाराज कदम ह भ प बाबासाहेब महाराज आनंदे दौलताबाद व पंचक्रोशीतील भाविक उपस्थित होते नंतर महाप्रसाद लाभ गेतला

# आयुक्त कार्यालयावर धडकणार संघटित व असंघटित कामगार - भारतीय मजदूर संघाची घोषणा




**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनीधी / बबनराव वाघ**/ महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे ६ वे त्रैवार्षिक अधिवेशन रविवार दि.१ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वा. महालक्ष्मी लॉन्स, राजाराम पुलाजवळ, कर्वेनगर, पुणे येथे यशस्वीरीत्या संपन्न झाले.

या अधिवेशनाचे उदघाटन एस.मल्लेशम ( अखिल भारतीय अध्यक्ष, भारतीय मजदूर संघ ) यांनी केले. या कार्यक्रमाच्या स्वागत अध्यक्षा मा.मेधाताई कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे महावितरण चे संचालक मा.राजेंद्र पवार उपस्थित होते.

उद्धाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना एस.मल्लेशम यांनी सांगितले की देशातील श्रमिक व कामगार सध्या आव्हानात्मक कालखंडातून जात आहेत.

केंद्र सरकारने लागू केलेल्या ४ कामगार संहितां पैकी वेज कोड व सोशल सिक्युरिटी कोड चे भारतीय मजदूर संघाने स्वागत केले असून त्यांची त्वरित प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच केंद्र सरकारने देशभर समान मिनिमम फ्लोअर वेज जाहीर करावेत. पेन्शन फंडात वाढ व ई.एस. आय.सी. योजनेची पात्रता मर्यादा २१ हजारावरून ४२ हजार रुपये करावी अशी मागणी भारतीय मजदूर संघाने करत देशभर २५ फेब्रुवारी रोजी देशभर सरकार जागव आंदोलन करण्यात आल्याचे सांगितले.

मा.मेधा कुलकर्णी ( खासदार, राज्यसभा ) यांनी कंत्राटी कामगारांना कायम करावे या कोर्टाच्या निर्णयाचे स्वागत करून या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी पुढाकार घ्यावा अशी चर्चा करणार असल्याचे सांगितले.

वीज कंत्राटी कामगार संघ ही आपल्या विचारधारेची संघटना असल्यामुळे आंदोलनाची वेळ येऊ न देता प्रशासनाने तातडीने बैठका घेऊन संवाद साधत संघटनेच्या सदस्य कामगारांच्या समस्यां त्वरित सोडवल्या पाहिजे असा आग्रह वीज कंपन्याकडे धरला.

मा.राजेंद्र पवार (संचालक, महावितरण - मानव संसाधन) यांनी न्यायालयीन निकालावर अभ्यास करून कामगारांवर अन्याय होणार नाही अशी सकारात्मक भूमिका व्यक्त केली. वीज कंपनीची प्रतिमा सुधारणे, ग्राहक सेवेशी प्रामाणिक राहण्याची व सर्वांच्या सुरक्षतेते बाबत शपथ सर्व वीज कंत्राटी कामगारांनी त्यांनी दिली.

वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांना विविध आर्थिक व सामाजिक लाभ संघटनेने संघर्ष करून मिळवून दिले आहेत आता कोर्टाच्या आदेशानुसार इतर कामगारांना कायम करा व राज्यात कंत्राटी कामगार पद्धत कायम स्वरूपात बंद करत कंत्राटदार-विरहित वयाच्या ६० वर्षापर्यंत रोजगारात सुरक्षेसाठी हरियाणा पॅटर्न प्रस्ताव मंत्रिमंडळास समोर तातडीने आणण्यासाठी व अन्य प्रलंबित प्रश्नांसाठी दि.१६ एप्रिल २०२६ रोजी कामगार आयुक्त कार्यालय बांद्रा ( मुंबई ) येथे भव्य आक्रोश मोर्चा काढणार असल्याची घोषणा भारतीय मजदूर संघाचे प्रदेश अध्यक्ष ॲड.अनिल ढुमणे यांनी केले

या व्यतिरिक्त सी. व्ही. राजेश ( क्षेत्रीय संगठन सचिव ), किरण मिलगीर ( महामंत्री ), अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ प्रभारी के व्ही राधाकृष्णन

अध्यक्ष कंदी श्रीनिवासन ,

बाळासाहेब भुजबळ ( संघटनमंत्री ) तसेच अण्णासाहेब देसाई ( ज्येष्ठ मार्गदर्शक ) अरुण पिवळ ( सरचिटणीस ), माजी अध्यक्ष शरद संत व पालकमंत्री सुभाष सावजी उपस्थित होते.

अधिवेशनात राज्यातील सुमारे २३०० वीज कंत्राटी कामगार उपस्थित होते.

१ ) हरियाणा पॅटर्न प्रमाणेच कंत्राटदार मुक्त रोजगार धोरण राबवावे .

२ ) सर्व वीज कंत्राटी कामगारांना कायम सेवेत सामावून घ्यावे.

३) वीज उद्योगास स्वतंत्र वेतन श्रेणी लागू करावी.

४ ) किमान वेतन नव्हे, तर जीवन वेतन द्यावे.

५ ) ई.एस.आय.सी पात्रता मर्यादा २१ हजारांवरून ४२ हजार रुपये करावी असे ५ ठराव एकमताने अधिवेशनात मंजूर करण्यात आले.

या अधिवेशनात २०२६वटे २०२९ साला साठी संघाचे अध्यक्ष म्हणून निलेश खरात तर सरचिटणीस म्हणून सचिन मेंगाळे यांची फेरनिवड करण्यात आली. तसेच कार्याध्यक्ष म्हणून राहुल बोडके, संघटन मंत्री उमेश आणेराव, कोषाध्यक्ष सागर पवार, उपमहामंत्री अमर लोहार (कोल्हापूर) व अभिजीत माहुरकर (नागपूर) यांच्यासह चार उपाध्यक्ष व चार सचिव जालना जिल्ह्यातील तात्यासाहेब सावंत याची

महाराष्ट्र अध्यक्ष महावीतरण कंपनीच्या पदावर नियुक्ती झाली तसेच महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपनीसाठी राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून बाळासाहेब भुजबळ होते.

अधिवेशनाचा समारोप सी. व्ही. राजेश यांनी केला.अधिवेशनाचे यशस्वी आयोजन पुणे जिल्हा अध्यक्ष निखील टेकवडे, सचिव योगेश महांगरे व सुमीत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली दहा समित्या कार्यरत होत्या. पुण्यातील २५२ कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला..

## सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांचा दौरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनीधी** / महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. रविवार दि.८ मार्च २०२६ रोजी नागपूर येथून जालना येथे सायंकाळी ६ वाजता शासकीय विश्रामगृहात आगमन व राखीव. सोमवार दि.९ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ ते १२.३० वाजेपर्यंत सफाई कर्मचारी संघटनेसोबत बैठकीस उपस्थिती. दुपारी १ ते २ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध कर णे व त्यांचे पुर्नवसन करणेबाबतचा अधिनियम २०१३ची अंमलबजावणीबाबत तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारणासाठी केलेल्या उपाययोजनाबाबत आढावा बैठकीस उपस्थिती. बैठकीनंतर पत्रकार परिषद घेतील. दुपारी २ ते ३ वाजेपर्यंत राखीव. दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत महानगरपालिका आयुक्त यांच्यासमवेत नॅशनल क्शन फॉन मॅकनाईज्ड सॅनिटेशन इकोसिस्टमची जालना जिल्ह्यातील अंमलबजावणी तसेच मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकानूसार लाड पागे समितीच्या शिफारसीप्रमाणे प्रलंबित प्रयाण करतील. .

## समाज कल्याणच्या पुरस्कारासाठी अर्ज करावेत..

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनीधी** /सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत समाजकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था आणि समाजसेवकांना दरवर्षी विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते.

सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षांतील पुरस्कारांसाठी इच्छुक पात्र संस्था तसेच उमेदवारांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जालना समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजू एडके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

समाजकल्याण क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था आणि वैयक्तिक स्तरावर उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक यामध्ये सहभागी होऊ शकतात. दोन्ही वर्षांच्या (२०२४-२५ व २०२५-२६) पुरस्कारांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख १५ मार्च २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे. पुरस्कारासाठी कामाची गणना १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील कामगिरीवर आधारित असेल.

वर्षासाठी आणि ज्या विशिष्ट पुरस्कारासाठी अर्ज केला जात आहे, त्या पुरस्कारासाठी शासनाने विहित केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

## सेवानिवृत्ती निमित्य चालकाने दिले कन्नड आगारास स्वच्छेने नोटा मोजण्याचे मशीन

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी** /कन्नड आगाराचे वाहक श्री.बी.बी.शेंडके यांनी आपल्या सेवानिवृत्ती निमित्य आयोजीत कार्यक्रमात कन्नड आगारास आपल्या वतीने एक नोटा मोजण्याचे मशीन सप्रेम भेट म्हणून दिले आहे.



श्री.बी.बी.शेंडके यांनी गेल्या २६ वर्षांपासून अत्यंत प्रामाणिक सेवा करून दि.२८ फेब्रुवारी रोजी वाहक या पदावरून सेवानिवृत्त झाले असता त्यांचा कन्नड आगाराचे वतीने सप्तनिक भव्य असा निरोप समारंभ आयोजीत करण्यात आला होता.यावेळी त्यांनी बजावलेल्या सेवा कालावधीत आगारातील कर्मचारी वर्गास दैनंदिन रोकड जमा करतांना आगाराचे लिपिक व वाहक यांना हिशोब देतांना जो व्हायचा तो त्रास लक्षात घेऊन त्यांनी त्यावर तोडगा म्हणून स्वच्छेने आपल्या वतीने आगारास एक रक्कम मोजणारे मशीन भेट म्हणून दिले आहे.या निरोप समारंभा प्रसंगी आगार व्यवस्थापक स्वातीताई बाखडे,स्थानक प्रमुख संघर्ष पगारे,वाहतूक निरीक्षक सागर पाटील,वाहतूक नियंत्रक संतोष बैरागी,यासह आगारातील कार्यालईन कर्मचारी,चालक वाहक,तंत्रनिकेतन विभागातील कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भास्कर आबा दानवे यांनी साजरे केले अनाथ विद्यार्थ्यांसोबत धुलीवंदन

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनीधी** /जालना तालुक्यातील दहिफळ तांडा येथील वसंतराव नाईक बालक आश्रम शाळेत भारतीय जनता पार्टीचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उपस्थितीत राहून धुलीवंदनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. आश्रमातील अनाथ विद्यार्थ्यांसोबत एकमेकांना रंग लावत आनंदाने धुलीवंदन साजरे करण्यात आले.

यावेळी भास्कर आबा दानवे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना धुलीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या व आयुष्यात चांगले शिक्षण घेऊन मोठे व्हा, त्यानंतर उपस्थित भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांसोबत आणलेल्या टिफिन डब्बा पार्टीचा आनंद घेतला. या भेटीद्वारे भास्कर आबा दानवे यांनी दहिफळ तांडा येथे भेट देत बंजारा समाजासोबत धुलीवंदनाचा सण उत्साहात साजरा केला.

यावेळी सिद्धिविनायक मुळे, तुकाराम चव्हाण, वसंतराव शिंदे, संजय डोंगरे, डॉ. तुकाराम कळकुंबे, परसराम तळेकर, विजय मोहिते, मुकेश चव्हाण, गोपाल चौधरी, युवराज राठोड, नारायण मोहिते, दौलत भुतेकर, भाऊसाहेब गोरे, बद्रीनाथ भसांडे, राजाराम जाधव, ज्ञानेश्वर राठोड, कृष्णा





गायके, नागेश अंभोरे, बाबासाहेब राठोड, मच्छिंद्र चव्हाण, लक्ष्मण राठोड, तुकाराम राठोड, लाशिराम राठोड, अनिल राठोड, शेषराव राठोड, भीमराव राठोड, शिवाजी राठोड, प्रदीप राठोड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## जालना जिल्ह्यात इंधनाचा मुबलक साठा;

### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनीधी** / आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जालना जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत आहे. या अफवेमुळे जिल्ह्यातील पेट्रोल पंपांवर वाहनधारकांनी इंधन भरण्यासाठी मोठी गर्दी केल्याचे चित्र दिसत आहे. मात्र, जालना जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा साठा पुरेसा असून इंधन पुरवठा पूर्णपणे सुरळीत आहे, असे स्पष्टीकरण जिल्हा प्रशासनाने दिले आहे.

जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर नियमितपणे पुरवठा सुरू आहे. नागरिकांनी घाबरून जाऊन पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये. अतिरिक्त इंधन साठा करण्याची कोणतीही गरज नसून नागरिकांनी संयम पाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप कंपन्यांच्या विक्री अधिकारी आणि प्रतिनिधींना इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत आवश्यक सूचना प्रशासनामार्फत देण्यात आल्या आहेत.

पुरवठ्याबाबत कोणतीही अडचण नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. इंधन तुटवड्याबाबत चुकीची माहिती किंवा अफवा पसरविणाऱ्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

नागरिकांनी कोणत्याही अनाधिकृत माहितीवर विश्वास न ठेवता, अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा, असे जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## सुखापुरी-कुक्कडगाव येथे भव्य 'शंकर पट' बैलगाडा शर्यतींचा थरार; भरघोस बक्षिसांची लुटालूट!




**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/ गणेश सपकाळ**/ छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून सुखापुरी आणि कुक्कडगाव ग्रामस्थांच्या वतीने दोन दिवसीय भव्य दिव्य 'शंकर पट' बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे. हा थरारक सोहळा सोमवार, ९ मार्च २०२६ आणि मंगळवार, १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजेपासून कुक्कडगाव येथील गायराण गट नंबर २७ च्या मैदानावर रंगणार आहे.

बक्षिसांचा वर्षाव

शर्यतीमध्ये सहभागी होणाऱ्या गाड्यांसाठी दोन गटांत आकर्षक रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत:

१. 'ड' गट (एकूण १५ बक्षिसे):
प्रथम क्रमांक: २१,०००
द्वितीय क्रमांक: १५,०००
तृतीय क्रमांक: १०,०००
(याशिवाय इतर १२ क्रमांकांसाठी ७,५०० पासून २,००० पर्यंतची बक्षिसे दिली जातील.)

२. जनरल गट (एकूण ११ बक्षिसे):
प्रथम क्रमांक: १५,०००
द्वितीय क्रमांक: ११,०००
तृतीय क्रमांक: ९,०००
(इतर ८ क्रमांकांसाठी ७,५०० पासून ३,००० पर्यंतची बक्षिसे आहेत.)

प्रवेश शुल्क (तिकीट दर):
जनरल गट: १,२००
'ड' गट: १,५००

नियोजन आणि पारदर्शकता

शर्यतीचा निकाल पारदर्शक लावण्यासाठी तज्ज्ञ पंच कमिटीची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये अशोक गुलाबराव बोटे, उद्धव हरिभाऊ गायकवाड, प्रताप भगवानराव राखुंडे, राजेंद्र सोपानराव गायकवाड आणि राजेंद्र रघुनाथ मोताळे यांचा समावेश आहे. मैदानावरील रंगत वाढवण्यासाठी बाबा लंगोटे (मास्तर), लक्ष्मण शिंदे आणि राजेंद्र लहुटे हे कॉमेंटरी (निवेदन) करणार आहेत.

प्रमुख उपस्थिती आणि मान्यवर

या सोहळ्याला वकील किरण वाघमारे, अंबड नगराध्यक्ष देवयानी कुलकर्णी, माजी जि.प. सदस्य बाप्पासाहेब गोल्डे, गंगासागर पिंपळे, डॉ. सावंत, अविनाश मांगदरे, राजेंद्र चिल्लारे, दीपक शेट जैस्वाल आणि रामकिशन औटे यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नियम व अटी

सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाईल.

जनावरांची सुरक्षितता आणि कोणत्याही प्रकारची जीवितहानी टाळण्याची जबाबदारी संबंधित बैलगाडा मालकाची राहील.

पंचांचा निर्णय हा अंतिम आणि सर्वांवर बंधनकारक असेल.

**आयोजकांचे आवाहन:**

सचिन लहामगे (माजी उपसरपंच), अर्जुन जाधव, आसाराम चौरे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी या शर्यतींच्या यशस्वीतेसाठी कंबर कसली आहे. परिसरातील सर्व बैलगाडा प्रेमींनी आणि ग्रामस्थांनी या ऐतिहासिक सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक समितीने केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813